## भटक्या जनावरांना पकडून गोशाळेत रवानगी

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ९ ऑगस्ट :** महसूल विभागाकडून देण्यात येणा-या सेवा आणि विभागाकडून राबविण्यात येणा-या विविध योजनांबाबत नागरिकांमध्ये जागरुकता वाढावी, शासनाबद्दल आणि शासनाच्या कामकाजाबद्दल नागरिकांचा विश्वास वृध्दिंगत व्हावा, यासाठी विशेष मोहीम व लोकाभिमुख उपक्रम राबविण्याच्या उद्देशाने १ ते ७ ऑगस्ट या कालावधीत महसूल सप्ताह साजरा करण्याच्या सुचना शासनाने दिल्या आहेत. जिल्हाधिकारी कार्यालय, उपविभागीय अधिकारी कार्यालय आणि तहसील कार्यालय चंद्रपूरच्या वतीने रक्तदान शिबीर व आरोग्य तपासणी शिबीर घेण्यात आले.

## घुग्घूस येथे वृक्ष दिंडीचे आयोजन

**महासागर प्रतिनिधी**

**घुग्घुस दि. ०९ ऑगष्ट :** प्रियदर्शिनी कन्या विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय, घुग्घुस ,लॉयडस् इनफिनाईट फाऊंडेशन व ए.सी.सी. चांदा सिमेंट वर्क्स,अदानी फाऊंडेशनच्या संयुक्त विद्यमाने आयोजित भव्य वृक्षदिंडीने संपूर्ण घुग्घुस नगरी दुमदुमून गेली.यावेळी अध्यक्षस्थानी प्राचार्या अनू चोथे तर प्रमुख अतिथी लॉयडस् इन्फीनाईट फाऊंडेशन चे सी.एस.आर.सहायक व्यवस्थापक दिपक साळवे, नगर परिषद घुग्घूसचे लेखापाल प्रविण धोंगडे, केंद्र प्रमुख अनिल दागमवार, सामाजिक कार्यकर्ते ब्रिजभूषण पाझारे, सी.एस.आर.अधिकारी अनुराग मत्ते उपस्थित होते.

# मनोरंजन क्लबच्या नावाखाली जुगार भरविणाऱ्या क्लबवर एलसीबीची धाड

### कोरपना तालुक्यातील पोडसा येथील घटना

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ९ ऑगस्ट :** स्थानिक गुन्हे शाखा चंद्रपूरचे पथक व उप पोलीस स्टेशन लाठी येथील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी ९ ऑगस्ट, २०२५ रोजी कोरपना तालुक्यातील पोडसा येथील सार्वजनिक ठिकाण मनोरंजन क्लब, राजीव समाधान मल्टीपरपज सोसायटी, हिरापूर ता. कोरपना जि. चंद्रपूर शाखा पोडसा रजि. नं. एफ-००१४८११ येथे धाड मारली.




क्लब चालक महेश्वर गोपालनायक अजमेरा वय ४२ वर्ष, रा. चिंताकुंडा ता. शिरपूर जि. आसिफाबाद (तेलंगणा) याने संयोजक यांचेशी संगनमत करुन मनोरंजनच्या नावाखाली अनाधिकृत जुगार खेळविला तसेच परवाना अटी व सुचनांचे जाणिवपूर्वक उल्लंघन केले आहे. सदर ठिकाणी पंचनामा कार्यवाही दरम्यान डीव्हीआर, ताश पत्ते, कॉईन, रजिस्टर असा एकुण ३४५० रुपयाचा माल जप्त करण्यात येवुन क्लब चालक, संयोजक, जुगार खेळणारे सदस्य आणि अपप्रेरणा देणारे आरोपीविरुध्द उप पोलीस स्टेशन लाठी येथे विविध कलमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारच्या कोणत्याही क्लब मध्ये जुगार बाबत असल्यास, त्वरीत जवळील पोलीस स्टेशन किंवा पोलीस नियंत्रण कक्ष चंद्रपूर येथील डायल ११२ वर कॉल करुन माहिती द्यावी.

### बाबुपेठ येथे अवैध देशी दारु विक्रेत्यांवर कारवाई

पोलीस स्टेशन, चंद्रपुर शहर येथे दिनांक ९ ऑगस्ट २०२५ रोजी डिबी, पथक अधिकारी व पो स्टॉफसह पो स्टे परिसरात वॉश ऑऊट मोहीम दरम्यान पेट्रोलींग करित असता धाड टाकली असता युवराज कैलास हाडे वय ३५ वर्ष रा. बाबुपेठ वार्ड क. १ चंद्रपूर कडून रॉकेट संत्रा कंपनीच्या देशी दारूच्या २४ नग कि१८०० चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. रजनी राजेंद्र साटोने वय ५५ वर्ष रा. बाबुपेठ वार्ड क. २ पंचशील चौक चंद्रपूर यांचे कडुन रॉकेट संत्रा कंपनीच्या देशी दारूच्या १६ नग किं. ६४० रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सईताई गोपाळ मैथी वय ८९ वर्ष रा. बाबुपेठ वार्ड क. २ पंचशील चौक चंद्रपूर यांचे कडून रॉकेट संत्रा कंपनीच्या देशी दारु बॉटल १६ नग किं६४० चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. संगीता देवीदास गेडाम वय ५५ वर्ष रा बाबुपेठ बाबानगर वार्ड चंद्रपूर यांचे कडुन रॉकेट संत्रा कंपनीच्या देशी दारूच्या १२ नग कि. ४८० रु. मुद्देमाल जप्त करण्यात आला. भिमराव प्रभाकर माउलीकर वय ५५ वर्ष रा. महात्मा फुले चौक बाबुपेठ वार्डयाचे कडुन सत्रा कंपनीच्या देशी दारूच्या २० नग किं. ८४० चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. साहुल अशोक देवगडे वय ४० वर्ष रा बाबुपेठ वार्ड क २ पंचशील चौक यांचे कडून रॉकेट संत्रा कंपनीध्या देशी दारूच्या १४ नग किं ५६ चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. असा एकूण ४९६० चा मुद्देमाल मिळून आला. सदर कार्यवाही पो.नि. निशीकांत रामटेके यांचे नेतृत्वात सपोनि राजेंद्र सोनवणे, सपोनि सहारे, पोउपनि दत्तात्रय कोलटे, विलास निकोडे, कपील घुगे, परि पोउपनि वैभव चव्हाण, भावना रामटेके, तनुजा गजभे, सचिन बोरकर, लक्ष्मण रामटेके, संजय बीटे, इमरान शेख, निकेश हेंगे, जावेद सिध्दीकी, राकेश फुकट कपूरचंद खरवार आदिंनी केली आहे.



### गावखेड्यात पोळा सणाचा उत्साह

ग्रामीण भागातील अऱ्हेर नवरगाव येथील मुर्तीकार आशिक राजेंद्र वकेकार यांनी देखणा नंदी बैल घडविला आहे. याचे प्रशांत डांगे यांनी टिपलेले छाया चित्र.

# ट्रॅक्टरची दुचाकीला धडक सिआरपीएफचा जवान ठार

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**चिमूर, दि. ९ ऑगस्ट :** जांभुळघाट रामपूर नेरी रस्त्यावर ट्रॅक्टरने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने दुचाकी स्वार अविनाश खेडेकर हा जागीच ठार झाला. ही घटना दिनांक ९ ऑगस्ट ला ५ ३० वा दरम्यान घडली.

अविनाश शामराव खेडेकर (३५) रा. मोहाडी चक तालुका नागभीड जिल्हा चंद्रपूर येथील असून तो सीआरपी एफ जवान होता. दिनांक ९ ऑगस्ट ला कळमगाव येथे त्यांची पत्नी प्रांजली अविनाश खेडेकर , किरण लेडे (साळा ), अनिशा अतुल खेडेकर (भावसुन ) यांना भेटण्यासाठी बुलेटने एम एच ३४ बि डब्लू १०० या दुचाकीने जात असतांना नेरी रामपूर जवळ गोरखेडा तलावाजवळ समोरून चिखल्टी करून येत असलेल्या ट्रॅक्टरने जोरदार धडक दिली. त्यामुळे दुचाकी स्वार अविनाश खेडेकर हा रस्त्याच्या कडेला दुचाकी सह फेकला गेला. त्यात अविनाश खेडेकर जागीच ठार झाला. अपघात ऐवढा भयकर होता की चिखलटी ट्रॅक्टरची क्यॉजबील तुटून बाहेर पडली . घटनेची माहिती मिळताच एपीआय मल्लारी ताळीकुटे घटना स्थळी येऊन पंचनामा करीत शव शवविच्छेदन साठी उपजिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आले. पोलीस प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार सीआरपीएफ जवानाला धडक दिलेला ट्रॅक्टर घटना स्थळी मिळाला नसुन पोलीस प्रशासन शोध घेत आहे .



## जन सुरक्षा विधेयक विरोधात आंदोलन !

### मूल शहरात विरोधी कुती समितीची सभा आज

**महासागर प्रतिनिधी**

**मूल, दि. ९ ऑगस्ट :** जन सुरक्षा विधेयक २०२४ या काळ्या कायद्याच्या विरोधात हा संविधान विरोधी कायदा रद्द करण्याच्या दृष्टीने राज्यभरामध्ये एक मोठे आंदोलन निर्माण करण्यात येत आहे. याची धग मूल तालुक्यात पोहोचली आहे. या कायद्यान्वये अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा येणार असून संघटन बनवण्याचा, आपल्या अधिकारासाठी , आपल्या शिक्षणासाठी, आपल्या रोजगारासाठी, आपल्या शेतीविषयक हक्कांसाठी , महिलांच्या अधिकार रक्षणासाठी ,धरणे देणे,आंदोलन करणे, मोर्चा काढणे तर दूरच एकूणच आमच्या स्वातंत्र्याला पूर्णपणे नकारणारे हे विधेयक रद्द करण्यासाठी सर्व पुरोगामी संघटना एकवटण्याचा असून या विरोधात आंदोलन उभे करण्याच्या दृष्टीने मुल मधील सर्व पुरोगामी संघटनांनी एक सभा व मार्गदर्शन शिबीर घेण्याचे ठरलेले आहे . सर्व संविधान प्रेमी व जागरूक नागरिकाची सभा स्थानिक नवभारत विद्यालयात दि. १० ऑगस्ट ला दुपारी १२ वाजता आयोजित करण्यात आली आहे. सभेसाठी न चुकता संविधान प्रमी जनतेने मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन जन सुरक्षा विरोधक कुती समितीचे वतीने डॉ. अभिलाषा गावतुरे यांनी केले आहे.

## ९ ऑगस्ट क्रांती दिना निमित्त आ. वड्डेटीवार यांनी केले अभिवादन

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**चिमूर, दि. ९ ऑगस्ट :** सन १९४२ च्या भारतीय स्वातंत्र लढ्यातील ऐतिहासिक क्रांती भूमी असलेल्या चिमूर येथे ९ ऑगस्ट क्रांती दिना निमित्त शहीद विरांना नमन करण्यासाठी कांग्रेस विधानसभा गट नेते आमदार विजय वड्डेटीवार यांनी हुतात्मा स्मारक येथे पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केले.



यावेळी खासदार डॉ नामदेव किरसाण, माजी आमदार डॉ अविनाश वारजूकर,डॉ सतीश वारजूकर, माधव बिरजे शिंगरे, गजानन बुटके, धनराज मुंगले, विजय गावंडे, विवेक कापसे,राम राऊत, गजानन बुटके, अविनाश अगडे, संदिप कावरे, विजय डाबरे, भावना बावनकर, हेमलता नन्नावरे, सचिन गाडीवार सह शेकडो पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# ऑगस्ट क्रांती दिनी आ. भांगडीया यांची शहीदांना आदरांजली अर्पण

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**चिमूर, दि. ९ ऑगस्ट :** दि. ९ ऑगस्ट २०२५ क्रांती दिनी आमदार किर्तीकुमार उर्फ बंटीभाऊ भांगडीया यांनी सन १९४२ च्या भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील ऐतिहासिक क्रांती भुमी असलेल्या चिमुर येथील हुतात्मा स्मारक व अभ्यंकर मैदान किल्ला परिसर चिमुर येथे विर शहीदांना आदरांजली अर्पण करून कृतज्ञता व्यक्त केली.



यावेळी भाजपा तालुका अध्यक्ष राजु पाटील झाडे, राजु पाटील देवतळे, भाजपा जेष्ठ नेते घनश्याम डुकरे, डॉ दीपक यावले,मनिष तुम्पलीवार, निलम राचलवार, कमल असावा, संजय खाटीक, पक़ाश वाकडे, संजय नवघडे सचिन फरकाडे,श्रेयस लाखे अमित जुमडे, सतिश जाधव, रमेश कंचर्लावार, किशोर मुंगले, हर्षल डुकरे, मनिष नाईक, पव़िण सातपुते, गीता लिंगायत, मायाताई नन्नावरे, आशा मेश्राम, भारती गोडे, रत्नमाला मेश्राम, शारदा शिरभय्ये,निलेश गभणे, लिलाधर बन्सोड,व मोठ्या संख्येने चिमुर येथील राष्ट्रप्रेमी नागरिक, भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

**ब्रम्हपुरी:** जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा, शिष्यवृत्ती परीक्षा व सैनिकी स्कूल प्रवेश परीक्षासाठी बसणाऱ्या खाजगी अनुदानित शाळा आणि इंग्रजी कॉन्व्हेन्ट शाळेतील हिंदी, इंग्रजी व मराठी माध्यमांच्या इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन करण्यात आले.

## विदर्भ विभागीय मच्छीमार सहकारी संघाच्या उपाध्यक्षपदी भद्रावतीचे नंदू पढ़ालची निवड



**महासागर तालुका प्रतिनिधी**

**भद्रावती, दि. ९ ऑगस्ट :** महाराष्ट्र सहकारी संस्था निवडणूक नियम २०१४ च्या नियम ३२ नुसार, शनिवार, २६ जुलै रोजी नागपूर येथे झालेल्या २०२५-२६ ते २०३०-३१ या कालावधीसाठी झालेल्या विदर्भ विभागीय मच्छीमार सहकारी संघाची निवडणूक पार पडली.

शुक्रवार दि.८ ऑगस्टला नागपूर येथे पार पडलेल्या अध्यक्ष व उपाध्यक्ष पदाच्या निवडणुकीत भद्रावती येथील माजी नगरसेवक तथा मच्छिंद्र मच्छूआँ सहकारी संस्थेचे स्वीकृत सदस्य तसेच सहकार पॅनलचे उमेदवार नरेंद्र उर्फ नंदूभाऊ महादेव पढाल हे एक मताने विजयी झालेत.यात पढाल यांनी ९ मते घेतली तर त्यांचे प्रतिस्पर्धी वासुदेव सूरजूसे यांनी ८ मते घेतली.सुरजुसे यांचा एक मताने पराभव झाला.तसेच अध्यक्षपदाच्या निवडणुकीत प्रेमकुमार गजपुरे व उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती त्यांनी प्रत्येकी ९-९ मते घेतली.घेण्यात आलेल्या ईश्वर चिठ्ठीत प्रेमकुमार गजपुरे हे अध्यक्ष पदाच्या निवडणुकीत विजयी झाले. या निवडणूक प्रक्रियेचे काम निवडणूक निर्णय अधिकारी सुदाम रोकडे यांनी पाहिले. त्यांच्या या निवडीचे विदर्भ स्तरावर अभिनंदन केला जात आहे.

# सिईओने दिली कोलारा ग्रामपंचायतला भेट

### सिईओ कडून विद्यार्थीनींचे कौतुक

**महासागर प्रतिनिधी**

**नेरी, दि. ९ ऑगस्ट :** चिमुर तालुक्यातील काही निवडक गाव भेटी व आढावा बैठकीचा दौऱ्याच्या निमित्य जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह यांनी सरपंच शोभा कोयचाडे व ग्रा प सदस्य गणेश येरमे यांनी गाव भेट देण्याची विनंती केली व लगेच सिईओ साहेब कोलारा तु येथील ग्राम पंचायत कार्यालयाला सदिच्छा भेट दिली व कामाची पाहणी केली आणि आयएसओ मानांकन जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोलारा येथे भेट मान्यवराचे औक्षवंत करून विद्यार्थी कडून स्वागत करण्यात आले. तालुक्यातील पहिली मॉडेल २ वर्ग खोल्याची पाहणी करण्यात आली शाळेतील भौतिक सुविधा विषयक चर्चा करण्यात आली ग्राम पंचायत च्या वतीने गावातील सामाजिक शैक्षणिकदृष्ट्या आरोग्य मूलभूत सुविधा विषयावर ग्राम पंचायत सरपंच शोभा कोयचाडे व सदस्य गणेश येरमे यांनी भौतिक माहिती दिली जिल्हा परिषद प्रशासन सर्वतोपरी सहकार्य करणार असे उपस्थिताना सांगीतले. ग्राम पंचायत व जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकीत सिह यांचा शॉल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. ग्राम पंचायत भेटी दरम्यान पचायत समिती प्रभारी गटविकास अधिकारी मोरे विस्तार अधिकारी गणविर कांबळे ,विधाते, पोटूळे , सरपंच शोभा कोयचाडे सदस्य गणेश येरमे सचिव संजय ठाकरे मुख्याधापक किशोर गभने दामोधर रामटेके मधुकर बोकडे बावनकर मॅडम ,अंगणवाडी सेविका/ मदतनिस गुजन सावसाकडे अर्पिता चौधरी रिना ननावरे उमेश जिवतोडे यासह ग्रामस्त उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांनी टिळकांचे चरित्र अभ्यासले पाहिजे : ॲड. रवींद्र भागवत

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ९ ऑगस्ट :** आजच्या काळात विद्यार्थ्यांपुढे अनेक आव्हाने आहेत. चित्त अस्थिर करणाऱ्या अनेक गोष्टी, मोबाईल सारखी साधने भोवताली असताना त्यातून स्वतःला स्थिर करता येणे महत्त्वाचे आहे. त्यासाठीच विद्यार्थ्यांनी टिळकांचे चरित्र अभ्यासले पाहिजे, असे प्रतिपादन लोकमान्य टिळक स्मारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. रवींद्र भागवत यांनी केले. ते लोकमान्य टिळक पुण्यतिथी कार्यक्रमात अध्यक्ष म्हणून बोलत होते.

लोकमान्य टिळक स्मारक मंडळाद्वारे संचालित सर्व विद्यालयातर्फे आयोजित लोकमान्य टिळक पुण्यतिथीचा कार्यक्रम प्रियदर्शिनी इंदिरा गांधी सभागृहात संपन्न झाला. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून दैनिक लोकसत्ता चे वृत्तसंपादक रवींद्र जुनारकर उपस्थित होते .आपल्या मनोगतात जुनारकर म्हणाले की सध्या समाज माध्यमांवर महापुरुषांच्या चारित्र्य हननाचे काम सुरू आहे.




त्यामुळे सामान्य माणसांनी बोलणे आता आवश्यक झाले आहे. लोकमान्य टिळकांनी शंभर वर्षांपूर्वी मांडलेला अर्थ विचार अतिशय महत्त्वाचा आहे.१०० वर्षांपूर्वी असा विचार करणारे टिळक हे द्रष्टे नेते होते. यात्रसंगी तिन्ही शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. प्रेरिता भास्कर चौधरी (लोकमान्य टिळक विद्यालय), सुप्रिया प्रकाश तोकलवार (लोकमान्य टिळक कन्या विद्यालय), पूर्वा बालू रूपा रेल (लोकमान्य टिळक ज्ञानमंदिर) या विद्यार्थ्यांना आदर्श विद्यार्थी म्हणून गौरविण्यात आले.

यात्रसंगी स्मारक मंडळाचे उपाध्यक्ष श्रीपाद मुनगंटीवार सचिव गांगेय सराफ विराजमान होते. सभागृहात मंडळाचे कोषाध्यक्ष ॲड. प्रशांत घट्टूवार, सहसचिव डॉ. प्रवीण पंत, सदस्य डॉ.राम भारत, ॲड. अभय पाचपोर व दत्तप्रसन्न महादाणी तसेच माजी मुख्याध्यापिका जया भारत, डॉ. सविता भट, श्रीमती चवरे, मंगला बंडीवार,राजनहिरे, वसंत थोटे, दर्शना थोटे, तिन्ही शाळांचे मुख्याध्यापक, उप मुख्याध्यापक, पर्यवेक्षक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक उपस्थित होते. प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय मंडळाचे सचिव गांगेय सराफ यांनी करून दिला. चारही शाळांच्या शैक्षणिक सांस्कृतिक आणि क्रीडा क्षेत्रातील प्रगतीचा अहवाल त्यांनी सादर केला तर मंडळाचे उपाध्यक्ष श्रीपाद मुनगंटीवार यांनी आभार व्यक्त केले.

# राजुऱ्याच्या नामांकित आदर्श शिक्षण प्रसारक मंडळातील 'आदर्श'वाद

### संस्थेतील सात संचालक बडतर्फ

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**राजुरा, दि. ९ ऑगस्ट :** येथील स्व प्रभाकरराव मामुलकर संस्थापक अध्यक्ष असलेल्या आदर्श शिक्षण प्रसारक मंडळातील संचालकांचा वाद मागील सहा वर्षापासून सुरू असून संयुक्त धर्मादाय आयुक्तांनी सात संचालकांना मंडळातून बडतर्फ केल्याचा निकाल दिला आहे.या निकालाने आदर्श शिक्षण प्रसारक मंडळातील ' आदर्श ' वाद चव्हाट्यावर आला आहे.

स्व प्रभाकरराव मामुलकर यांनी आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना करून तळागाळातील मुलांना शिक्षणाचे दालन सुरू आहे.माणिकगड पहाडा सारख्या दुर्गम व डोंगराळ भागात शिक्षण संस्था उघडून कोलम व आदिवासी मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणले.

या संस्थेचे राजुरा, कोरपना, जिवती व गोंडपिपरी तालुक्यात ४४ शाळा, महाविद्यालये व आश्रम शाळा सुरू आहे.मात्र प्रभाकरराव मामुलकर यांच्या निधनानंतर संचालकातील वाद उफाळून आला.ज्या संस्थापक अध्यक्षांनी शिक्षणाचा वटवृक्ष उभा केला,त्यांच्या धर्मपत्नी श्रीमती सुमनताई मामुलकर यांना संस्थेत सामावून घेण्यासाठी काही महाभाग संचालकांनी विरोध केला. तेव्हापासूनच संचालकांमधील आदर्श वाद समोर आला व नामांकित संस्थेला ग्रहण लागले.याच संस्थेतील संचालक जसविंदर सिंग धोतरा यांचे संस्थेतील संचालकांसोबत वाद निर्माण झाला व त्यांनी काही मुद्यावर बंड पुकारत त्यांनी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थांच्या कलम ४१- डी (१)(अ)(क)(ड)(ई) अंतर्गत संयुक्त धर्मादाय आयुक्तांकडे केस दाखल केली.

या केस चा निकाल तब्बल सहा वर्षानंतर लागला असून अर्जदार धोतरा यांच्या बाजूने न्यायालयाने निकाल दिला आहे.

यात संस्थेचे संचालक सुधाकर कुंडोजवर,श्रीधरराव गोडे, अविनाश जाधव, दत्तात्रय येगीनवर, ॲड संजय धोटे, दौलत भोंगळे,व साजिद हुसेन बियाबनी या सात संचालकांना संस्थेतून बडतर्फ करण्यात आले आहे. व तात्पुरती संचालक मंडळ स्थापन करण्यासंदर्भात निर्देश देण्यात आले आहे.

या निकालाने संस्थेतील संचालकांना जबर धक्का बसला आहे व आदर्श वादावर पडदा पडला आहे.

# आनंददायी व गुणवत्तापूर्ण शिक्षण हाच केंद्रबिंदू : शिक्षण मंत्री दादाजी भुसे

### शैक्षणिक गुणवत्ता आढावा बैठक

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ९ ऑगस्ट :** विद्यार्थी हे आपले दैवत आहे. त्यांना चांगले शिक्षण देणे व त्यांच्यातील कलागुणांना विकसित करणे, हे प्रत्येक शिक्षकाचे ध्येय असावे. आज कृत्रिम तंत्रज्ञान व ई- माध्यमे यांच्या युगातही विद्यार्थ्यांची जमिनीशी नाळ तुटणार नाही, याची काळजी घेणे आवश्यक आहे. त्यामुळे अभ्यासक्रमासोबतच खेळ, कला आदी बाबींना प्राधान्य द्यावे. आनंददायी व गुणवत्तापूर्ण शिक्षण हाच विकासाचा मुख्य केंद्रबिंदू आहे, असे प्रतिपादन राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी केले.

जिल्हा परिषद येथे आयोजित शैक्षणिक गुणवत्ता आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी आमदार किशोर जोरगेवार, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी गिरीश धायगुडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी नूतन सावंत, विभागीय शिक्षण उपसंचालक माधुरी सावरकर, शिक्षणाधिकारी अश्विनी सोनवणे, राजेश पाताळे, मुख्य लेखाधिकारी अतुल गायकवाड, विनीत मत्ते आदी उपस्थित होते.



चंद्रपूर येथील शैक्षणिक गुणवत्ता आढावा बैठकीत अनेक चांगल्या मुद्यांचे सादरीकरण झाले, असे सांगून शिक्षण मंत्री दादाजी भुसे म्हणाले, आयडॉल शिक्षकांच्या उपक्रमांचा इतरांनीही आदर्श घ्यावा. त्यांनी केलेले काम केवळ त्यांच्या शाळेपुरतेच मर्यादित न राहता संपूर्ण केंद्रातील शाळांनी त्याचे अनुकरण करावे. शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी ग्रामस्तरावरील शाळांना भेटी द्याव्यात. त्यामुळे स्थानिक स्तरावर छोट्या छोट्या अडीअडचणींची माहिती होते व हे प्रश्न सहजासहजी सुटण्यास मदत होते.

शाळांच्या भौतिक सुविधांना शासनाने प्राधान्य दिले आहे. यात शुद्ध पिण्याचे पाणी, स्वच्छता, स्वच्छ शौचालय, इमारतींची देखभाल दुरुस्ती, ई- सुविधा, वाचनालय, क्रीडांगण लॅब या बाबींचा समावेश आहे. शाळांना अधिकाधिक निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. स्थानिक स्तरावर सी.एस.आर फंड, खनिज विकास निधी व इतर स्त्रोतातूनही निधी उपलब्ध होऊ शकतो. विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी पालकांच्या उपस्थित करावी. प्रत्येक विद्यार्थ्याचे हेल्थ कार्ड तयार करण्यात येणार आहे.

